
राजर्षी शाहू महाराज

महाराष्ट्र शासन

# राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती मुदत वाढ

## देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती/नवबौद्ध विद्यार्थ्यांना आवाहन

### लाभाचे स्वरुप

- शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेले पूर्ण शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक शुल्क इ.देण्यात येईल.
- शैक्षणिक संस्थेतील वसतिगृह व भोजन शुल्क याचा त्यांच्या अकारणीप्रमाणे खर्च देण्यात येईल.
- शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात जागे अभावी प्रवेश न मिळाल्यास सदर विद्यार्थ्यांना संस्थेने आकारणी केलेले वसतिगृह व भोजन शुल्क देण्यात येईल.
- वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजने प्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येईल.
- प्रवेशीत अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या पुस्तकांसाठी रु. ५,०००/- व शैक्षणिक साहित्य आणि इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकूण रु. ५,०००/- असे एकूण रु. १०,०००/- प्रत्येक वर्षी देण्यात येईल.

### अटी व शर्ती

- महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती/नवबौध्द प्रवर्गातील महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.६.०० लाखापेक्षा कमी असावे.
- पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची कमाल वयोमर्यादा २५ वर्षे व पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा ३० वर्ष इतकी असेल.
- अभ्याक्रमाच्या प्रथम वर्गाला शिकत असला पाहिजे. तथापि त्यापुढील वर्षाचे विद्यार्थी अर्ज करु शकतील परंतु त्यांचा विचार प्रथम वर्षाचे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास करण्यात येईल.
- विद्यार्थी इ.१० व १२वी ची परिक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील अन्य परिक्षा मंडळातून उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.
- पदवी अभ्यासक्रमासाठी इ. १२ वीच्या परिक्षेमध्ये किमान ५५% गुण मिळविणे आवश्यक राहिल व डायरेक्ट द्वितिय वर्षासाठी प्रवेशीत विद्यार्थ्यांना डिप्लोमामध्ये ५५% गुण आवश्यक.
- पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेमध्ये किमान ५५% गुण असावेत.
- सदरहू शिष्यवृत्ती देश पातळीवरील मान्यताप्राप्त संस्थामधील अभ्यासक्रमासाठी लागू राहील. संस्थांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध.
- शिष्यवृत्ती मंजूर करण्याचा अंतिम अधिकार शासनास राहिल.
- निवड झालेल्या विद्यार्थ्यास भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.

अर्ज भरण्याची अंतिम दिनांक व वेळ : २० जाने. २०१८ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत.

अर्जाचा नमुना व अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in/career व https://sjsa.mahrashtra.gov.in

जिल्ह्याचे सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावरुन अर्ज डाऊनलोड करुन तो सर्व आवश्यक कागदपत्राच्या-स्वसाक्षांकितप्रतिसह विहीत कालमर्यादेत पाठवावा.

आयुक्त,
समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च पथ,पुणे-४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१३७१८६,२६१२७५६९, Website : https://sjsa.maharashtra.gov.in, ईमेल : swcedn.nationalscholargmail.com